**नियमित दिवाणी दावा क्र.०३/२०२०**
**लक्ष्मण वि. धोंडीबा व ईतर**

–:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

वादी आणि त्यांचे अधिवक्ता हे हजर आहेत. प्रतिवादी आणि त्यांचे अधिवक्ता सुध्दा हजर आहेत. मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. वादीने साक्षीदारांची यादी सादर केलेली नाही. वादीने दि.०८/११/२०२३ रोजी स्वतःची साक्ष नोंदविली, दि.२८/०३/२०२४ रोजी साक्षीदार क्र.२ व ३ आणि आजरोजी साक्षीदार क्र.४ ची साक्ष पूर्ण केली. त्यावरून वादी हा एक–एक साक्षीदाराची साक्ष नोंदवित असल्याचे दिसून येते. परंतु दिवाणी नियमावलीप्रमाणे एक–एक साक्षीदाराची साक्ष किंवा तुटक स्वरूपात साक्ष नोंदविता येत नाही. आजरोजी वादीच्या पुढील साक्षीदाराकरिता प्रकरण पुढे नेमण्यासाठी कारण उपलब्ध नाही. सबब वादीने पुढील साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यास कसूर केल्याने वादीची साक्ष बंद करण्यात येते. संबंधितांनी नोंद घ्यावी.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.01.21 17:50:48 +0530

**ठिकाण – देवणी** **( श.अ. सुरजुसे )**
**दिनांक – २१–०१–२०२६** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**